निवडक

आमदार कथोरे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

मुरबाड : आमदार किसनराव कथोरे यांच्या वाढदिवसानिमित्त मुरबाड विधानसभा मतदारसंघासह ठाणे जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी हजारो झाडांची लागवड, लहान बालकांना जीवनोपयोगी वस्तूंच्या किटचे वाटप तसेच आठवडाभर विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांमध्ये गरजू नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते उत्तम विशे यांच्या सहकार्याने विविध सांस्कृतिक कार्यक्रमही घेण्यात आले. आमदार कथोरे यांना शुभेच्छा देण्यासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बदलापूरमध्ये द्रवखत निर्मिती उपक्रम

बदलापूर : रोटरी क्लब ऑफ बदलापूर स्मार्ट सिटी, रोटरी क्लब ऑफ बदलापूर इंडस्ट्रियल एरिया आणि रोटरी क्लब ऑफ बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कृत्रिम विसर्जन तलाव उभारण्यात आला. १२ बाय १५ फूट आकाराच्या तलावात सुमारे १,२०० ते १,३०० लिटर पाणी व अमोनियम बायकार्बोनेटचा वापर करण्यात आला. या प्रक्रियेत पीओपी मूर्तींचे सुमारे ७२ तासांत विघटन होण्यास मदत होते. एकाच दिवसात ८० हून अधिक मूर्तींचे विसर्जन झाले. रोटरीचे अध्यक्ष डॉ. अमोल उबाळे, रोहन सावरटकर व ॲड. तुषार साटपे यांनी उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी उपक्रमाचे कौतुक केले.

चालिहा साहेब मटकी मेळा उत्साहात



उल्हासनगर : उल्हासनगर कॅम्प-५ येथील प्रसिद्ध पूज्य चालिहा साहेब मंदिरात सिंधी समाजाच्या ४० दिवसीय चालिहा साहेब व्रत महोत्सवानिमित्त पारंपरिक मटकी मेळा उत्साहात पार पडला. 'आयो लाल झूलेलाल'च्या जयघोषात ६० हजारांहून अधिक भाविकांनी जलदेवतेचे पूजन केले. साई कालीराम, साई छोटूराम, संत-महात्मे, विश्वस्त व सेवाधाऱ्यांच्या उपस्थितीत भगवान झूलेलाल आणि अखंड ज्योत साहेबांची विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर बहराणा साहेबांची रस्म पूर्ण करून मटकी यात्रेला सुरुवात झाली. भाविकांनी मटकी पवित्र जलात विसर्जित केली.

चिरनेर जंगल सत्याग्रहाचा स्मृतिदिन

उरण : चिरनेर जंगल सत्याग्रहाचा ९६वा स्मृतिदिन शुक्रवार, २५ सप्टेंबर रोजी चिरनेर येथे साजरा करण्यात येणार आहे. २५ सप्टेंबर १९३० रोजी ब्रिटिश सरकारच्या जंगल कायद्याविरोधात चिरनेरच्या अक्कादेवी माळरानावर जंगल सत्याग्रह झाला होता. यावेळी ब्रिटिशांच्या गोळीबारात आठ हुतात्म्यांसह १३ जणांचा मृत्यू झाला होता. पालकमंत्री भरतशेठ यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कार्यक्रमाला खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश बालदी, प्रशांत ठाकूर, विक्रांत पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सप्टेंबरमध्येच 'ऑक्टोबर हिट'चा फील

तापमानात झपाट्याने वाढ; मोखाडा तालुक्यातील नागरिक घामाघूम

दीपक गायकवाड /मोखाडा

गेल्या महिन्यात मुसळधार बरसलेला पाऊस सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीलाच गायब झाल्याने मोखाडा तालुक्यात अचानक उष्मा वाढला आहे. गेल्या चार-पाच दिवसांत कमाल आणि किमान तापमानात पाच ते सहा अंश सेल्सिअसने वाढ झाली असून, सप्टेंबरमध्येच 'ऑक्टोबर हिट'चा अनुभव नागरिकांना येत आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिकांना उन्हाचे चटके सहन करावे लागत आहेत. गेल्या महिन्यात पावसाची संततधार कायम असल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला होता. परिणामी कमाल आणि किमान तापमानात घट झाली होती. मात्र, सप्टेंबरच्या सुरुवातीपासून पावसाने उघडीप घेतल्याने तालुक्यातील वातावरण पुन्हा उष्ण झाले आहे. आठ दिवसांपूर्वी कमाल तापमान जवळपास २५ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २३ अंश सेल्सिअस होते. मात्र, अवघ्या काही दिवसांत कमाल तापमान ३३ ते ३४ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. तापमानातील या वाढीमुळे वातावरणातील उष्णता अधिक जाणवत आहे.

हवेतील आर्द्रता आणि ओलावा कमी झाल्याने उन्हाचा तडाखा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. वाढत्या उष्णतेमुळे नागरिक घामाघूम होत असून, दुपारच्या वेळी घराबाहेर पडणेही त्रासदायक ठरत आहे. सप्टेंबरच्या सुरुवातीलाच जाणवणारा हा उष्मा म्हणजे 'ऑक्टोबर हिट'ची चाहूल असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. वाढत्या उष्णतेमुळे शीतपेयांची मागणी वाढली आहे. मात्र, सर्दी-खोकल्याच्या धास्तीमुळे अनेकजण थंड पेये घेणे टाळताना दिसत आहेत. दरम्यान, वातावरणातील बदल आणि वाढत्या उष्णतेमुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

पावसाने थोडीशी उघडीप घेताच वाढत्या तापमानाने पुन्हा डोके वर काढले आहे. मंगळवारी आणि बुधवारीही नागरिकांना उन्हाचे चटके सहन करावे लागले. राज्यातील काही भागांत अद्याप पाऊस सुरू असला तरी अनेक ठिकाणी पावसाने विश्रांती घेतली आहे. त्यानंतर हवामानात अचानक बदल झाल्याने सप्टेंबरमध्येच नागरिकांना ऑक्टोबर हिटचा अनुभव येत आहे.



वाढत्या तापमानामुळे वातावरणात उष्णता वाढली असून, सध्या तापमान ३३ ते ३४ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. त्यातच पावसाने काही काळ दांडी मारल्याने आणि महाराष्ट्रात परतीच्या पावसाला सुरुवात झाल्याने वातावरणातील तापमान टिकून राहिले आहे. त्यामुळे सर्वत्र उष्णतेचा परिणाम जाणवत आहे.

- **रिजवाना सय्यद**, कृषी व हवामान तज्ज्ञ, कोसबाड (डहाणू)

मागील एक ते दीड महिन्यापासून संसर्गजन्य आजारांच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. ग्रामीण रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात दररोज उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांपैकी सुमारे ७० टक्के रुग्ण हे संसर्गजन्य आजारांनी त्रस्त असतात. वातावरणातील दमटपणा कमी होऊन वातावरण पूर्णतः कोरडे झाल्याशिवाय रुग्णसंख्येतील ही वाढ आटोक्यात येणार नाही.

- **डॉ. भारतकुमार महाले**, वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, मोखाडा

ई-पीक पाहणीची प्रक्रिया किचकट

■ जव्हारमधील शेतकऱ्यांमध्ये नाराजी ■ सातबारावरील नोंदीअभावी लाभाची चिंता

दीपक भिसे/ जव्हार

शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न सुरू असले, तरी जव्हार तालुक्यातील दुर्गम ग्रामीण भागात मूलभूत सुविधांचा अभाव अद्याप कायम आहे. वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, इंटरनेटची अनुपलब्धता आणि मोबाईल नेटवर्कच्या समस्यांमुळे ई-पीक पाहणी करताना शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यातच पीक नोंदणीची प्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या किचकट असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या सहाय्यकांमार्फत शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी करून घेण्याची व्यवस्था केली होती. मात्र, आता शेतकऱ्यांनी स्वतःच पीक पाहणी करून नोंदणी करण्याचे निर्देश देण्यात आल्याने तालुक्यातील ग्रामीण भागात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शासनाने ई-पीक पाहणीसाठी नवीन मोबाईल ॲप विकसित केले असून, ११ सप्टेंबरपासून शेतकऱ्यांना स्वतः पीक नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्रक्रियेत फार्मर आयडीच्या माध्यमातून नोंदणी करावी लागते. त्यानंतर फेस बायोमेट्रिकसह विविध तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून पीक पाहणीची नोंद करावी लागते. ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांना या प्रक्रियेची तांत्रिक माहिती नसल्याने प्रत्यक्ष नोंदणी करताना अडचणी निर्माण होत आहेत. यापूर्वी नियुक्त सहाय्यकांमार्फत पीक पाहणी केली जात होती. मात्र, तांत्रिक अडचणी तसेच एका गटातील अनेक शेतकऱ्यांची नोंदणी करण्याची जबाबदारी यामुळे सहाय्यकांवर कामाचा मोठा ताण निर्माण झाला होता. परिणामी, शासनाने शेतकऱ्यांना स्वतः पीक पाहणी करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली.



पीक पाहणीबाबत संभ्रम कायम

पीक पाहणी शेतकरी स्तरावरच व्हावी, अशी मागणी जव्हारमधील तलाठ्यांकडून शासनाकडे करण्यात आली होती. त्यानुसार यापूर्वी सहाय्यकांमार्फत पीक पाहणी केली जात होती. आता शेतकऱ्यांना स्वत: पीक नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध झाली असली, तरी पुढील प्रक्रियेबाबत शासनाकडून कोणते नवीन आदेश दिले जातात, यावर पुढील कार्यवाही अवलंबून असल्याचे जव्हार तहसील कार्यालयाकडून सांगण्यात आले.

मी यापूर्वी सहाय्यकाकडून परिसरातील शेताची पीक पाहणी करून घेतली होती. मात्र, त्या पिकाची नोंद सातबारा उताऱ्यावर आलीच नाही. शासनाने आता वरातीमागून घोडे आणले आहेत. दुसरीकडे, खरीप पिकांचा विमा भरला असून, विमा कंपनी सातबारा उताऱ्यावर पीक नोंदीचा आग्रह धरत आहे. अशा परिस्थितीत आम्ही नेमके काय करायचे? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

- **सुरेश गवळी**, शेतकरी

पावसाअभावी भातशेती संकटात

सावंतवाडी, वेंगुर्ला, वैभववाडीत नुकसानीच्या नोंदी

सिंधुदुर्ग : जिल्ह्यात काही ठिकाणी पावसाने घेतलेल्या खंडामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा तसेच भातपिकाच्या नुकसानीचा पालकमंत्री नितेश राणे यांनी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेतला. काही भागांत भातपीक करपल्याच्या घटना निदर्शनास आल्याच्या पार्श्वभूमीवर बाधित शेतकऱ्यांना आवश्यक मदत व उपाययोजना उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, जिल्हा नियोजन अधिकारी यशवंत बुधावले, कृषी उपसंचालक ज्ञानेश्वर बढे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सावंतवाडी, वेंगुर्ला आणि वैभववाडी तालुक्यांत भातपिकाच्या नुकसानीची प्रकरणे प्रशासनाकडे प्राप्त झाली आहेत.

या नुकसानीची वस्तुनिष्ठ माहिती संकलित करून बाधित क्षेत्राचा आढावा घ्यावा आणि त्यानुसार आवश्यक उपाययोजनांचे नियोजन करावे, यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. या नुकसानीची वस्तुनिष्ठ माहिती संकलित करून आवश्यक त्या उपाययोजनांचे नियोजन करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. दरम्यान, जिल्ह्यातील विविध विकासकामे आणि जिल्हा वार्षिक योजनेच्या कामांचाही बैठकीत आढावा घेण्यात आला



जिल्ह्यातील विविध विकासकामे तसेच जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. उपलब्ध निधीचा प्रभावी आणि वेळेत विनियोग करण्यासोबतच विकासकामांची गुणवत्ता कायम राखण्यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन करावे, यावरही चर्चा झाली. जिल्हा वार्षिक योजनेतील कामांच्या अंमलबजावणीचा दर आठवड्याला आढावा घ्यावा. संबंधित यंत्रणांनी कामांची गती आणि गुणवत्तेकडे विशेष लक्ष द्यावे, दर आठवड्याला अंमलबजावणी यंत्रणांचा आढावा जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी घ्यावा.

- **नितेश राणे**, पालकमंत्री

उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या ताफ्यातील पोलीस अधिकाऱ्याचे निधन

ठाणे : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ताफ्यात अंगरक्षक म्हणून कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक विजय शंकर सांगडे (५७) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते कल्याण नियंत्रण कक्षात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होते. गेल्या तीन वर्षांपासून ते उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या एस्कॉर्ट पथकात जबाबदारी पार पाडत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, सांगडे हे ठाण्यातील कोर्ट नाका येथील शासकीय विश्रामगृहात ड्युटीवर असताना अचानक त्यांच्या छातीत तीव्र कळ आली आणि त्यांना चक्कर आली. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांचा मृतदेह ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात नेण्यात आला.

घटनेची माहिती मिळताच नौपाडा पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. सांगडे हे मूळचे जुन्नरचे रहिवासी होते. ठाणे सिव्हिल रुग्णालय परिसरात शोकाकुल वातावरणात त्यांना शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला. ठाणे पोलिसांच्या तुकडीने बंदुकीच्या फैरी झाडून त्यांना मानवंदना दिली. त्यांच्या निधनाने पोलीस दलात हळहळ व्यक्त होत आहे.

उल्हासनगरात डेंग्यूचा पहिला बळी

१७ वर्षीय मुलाचा उपचारादरम्यान मृत्यू

उल्हासनगर : उल्हासनगरात डेंग्यूने डोके वर काढले असून, लालचक्की परिसरातील १७ वर्षीय युग कृष्ण धामणे याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सुरुवातीला उल्हासनगरातील खासगी रुग्णालयात आणि त्यानंतर कल्याणमधील फोर्टिस रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू होते. मात्र, फोर्टिस रुग्णालयात दाखल केल्यानंतर अवघ्या तासाभरात त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे शहरातील डेंग्यू प्रतिबंधक उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

उल्हासनगर कॅम्प क्रमांक ४ मधील लालचक्की येथील वीनस रोडवरील एका गृहसंकुलात युग कृष्ण धामणे हा आपल्या कुटुंबासह राहत होता. गेल्या काही दिवसांपासून त्याला ताप येत होता. तापाची तीव्रता कमी-जास्त होत असल्याने कुटुंबीयांनी त्याला स्थानिक डॉक्टरांकडे उपचारासाठी नेले. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रक्ततपासणी करण्यात आली असता युगला डेंग्यूची लागण झाल्याचे निष्पन्न झाले.

बाप्पाच्या मंडपात पावसाचे पाणी साचले; भक्तांची तारांबळ

परतीच्या पावसाने उल्हासनगर जलमय; नालेसफाईच्या कामावर प्रश्नचिन्ह

उल्हासनगर : परतीच्या पावसाने उल्हासनगर शहराला जोरदार तडाखा दिल्याने अनेक सखल भागांत पाणी साचले. कॅम्प क्रमांक ५ मधील सेक्शन ३९, गुरुद्वाराजवळील जय भवानी चाळ परिसरातही पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचले. याच परिसरातील उपमहापौर अमर लुंड यांच्या प्रभाग क्रमांक १७ मधील जय भवानी मित्र मंडळाच्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडपात पाणी शिरल्याने गणेशभक्त आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांची धावपळ उडाली.



ऐन गणेशोत्सवात बाप्पाच्या मंडपातच पाणी साचल्याने मंडळाच्या कार्यकर्त्यांसह उपस्थित नागरिकांसमोर मोठी अडचण निर्माण झाली. अखेर काही चिमुकल्या मुलामुलींनी पुढाकार घेत मंडपातील पाणी बाहेर काढण्यास सुरुवात केली.

शहरातील अन्य सखल भागांतही पाणी साचल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागला. नाले व गटारांची पुरेशी सफाई न झाल्यामुळे पावसाच्या पाण्याचा निचरा होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला. त्यामुळे महापालिकेच्या पावसाळापूर्व नालेसफाईच्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, नाले-गटारांची तातडीने सफाई करून पाण्याचा निचरा करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

सेझ जमिनीच्या प्रश्नावर शेतकऱ्यांचा मोर्चा

पेण : महामुंबई सेझ प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनी प्रकल्प रद्द झाल्यानंतर मूळ शेतकऱ्यांच्या नावे पूर्ववत करण्याच्या मागणीसाठी मंगळवारी (दि. २२) पेण येथे शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाने या जमिनी शासनाकडे जमा करण्याबाबत अहवाल दिल्याचा दावा सेझबाधित शेतकरी हक्क संघर्ष समितीने केला आहे.



सकाळी १० वाजता महात्मा गांधी मंदिर येथे शेतकरी एकत्र येऊन प्रांताधिकारी कार्यालयाच्या दिशेने मोर्चा काढणार आहेत.

या आंदोलनात हजारो शेतकरी सहभागी होण्याची शक्यता समितीने व्यक्त केली आहे. नंदा म्हात्रे, राजेंद्र झेमसे, काशिनाथ पाटील, अभिमन्यू म्हात्रे, जितेंद्र ठाकूर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, जून २०२६ मध्ये महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सेझसाठी संपादित झालेल्या, मात्र प्रकल्पासाठी वापर न झालेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत देता येतील का, याबाबत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.

vedanta iron & steel

वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड

सीआयएन: एल२४१०९एमएच२०२३पीएलसी४११७७७

नोंदणीकृत कार्यालय: वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड, सी-१०३, अतुल प्रोजेक्ट्स, कॉर्पोरेट ॲव्हेन्यू न्यू लिंक, चकाला एमआयडीसी, मुंबई, महाराष्ट्र - ४०० ०९३

दूरध्वनी क्र.: +९१ ८३२ ६७१३६०१ **ई-मेल:** visl.cs@vedanta.co.in

वेबसाइट: www.vedantaironandsteel.com

दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६ च्या पोस्टल बॅलेट सूचनेचे शुद्धिपत्रक

हे शुद्धिपत्रक, यापुढे "**शुद्धिपत्रक**" म्हणून संदर्भित, वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड, यापुढे "**कंपनी**" म्हणून संदर्भित, यांच्याकडून ३१ ऑगस्ट, २०२६ दिनांकित पोस्टल बॅलेट सूचनेच्या संदर्भात, यापुढे "**पोस्टल बॅलेट सूचना**" म्हणून संदर्भित, त्यामध्ये नमूद केलेल्या बाबींसंदर्भात रिमोट ई-व्होटिंगद्वारे कंपनीच्या सभासदांची मंजुरी घेण्यासाठी त्यांना प्रसारित करण्यात आलेल्या सूचनेच्या अनुषंगाने जारी करण्यात येत आहे.

पोस्टल बॅलेट सूचनेतील बाब क्र. १० ते १६ चा भाग असलेल्या व्यवहारांच्या परिशिष्टांचा आणि प्रकटीकरणांचा तपशीलवार आढावा घेतल्यानंतर, कंपनीने काही प्रस्तावित व्यवहारांची व्याप्ती, वर्गवारी आणि वर्गीकरण, त्यामध्ये विचारात घेतलेली व्यवहार मूल्ये आणि मर्यादा, लागू मंजुरी आवश्यकता आणि भागधारकांना प्रदान करावयाची संबंधित प्रकटीकरणे यांचे पुढील मूल्यमापन करण्याची आवश्यकता ओळखली आहे.

त्यानुसार, पुरेशी खबरदारी आणि उत्तम कॉर्पोरेट गव्हर्नन्सच्या दृष्टीने, कंपनीच्या संचालक मंडळाने पोस्टल बॅलेट सूचनेतून खालील बाबी मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे:

बाब क्र. १०: कंपनी आणि कंपनीच्या काही ओळखण्यात आलेल्या संबंधित पक्षांदरम्यानच्या महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहारास/व्यवहारांना मंजुरी देणे.

बाब क्र. ११: कंपनीची महत्त्वपूर्ण उपकंपनी सेसा रिसोर्सेस लिमिटेड ("एसआरएल") आणि कंपनीच्या काही ओळखण्यात आलेल्या संबंधित पक्षांदरम्यानच्या महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहारास/व्यवहारांना मंजुरी देणे.

बाब क्र. १२: कंपनीची महत्त्वपूर्ण उपकंपनी सेसा मायनिंग कॉर्पोरेशन लिमिटेड ("एसएमसीएल") आणि कंपनीच्या काही ओळखण्यात आलेल्या संबंधित पक्षांदरम्यानच्या महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहारास/व्यवहारांना मंजुरी देणे.

बाब क्र. १३: कंपनीची महत्त्वपूर्ण उपकंपनी ब्लूम फाउंटन लिमिटेड ("बीएफएल") आणि कंपनीच्या काही ओळखण्यात आलेल्या संबंधित पक्षांदरम्यानच्या महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहारास/व्यवहारांना मंजुरी देणे.

बाब क्र. १४: कंपनीची महत्त्वपूर्ण उपकंपनी ईएसएल स्टील लिमिटेड ("ईएसएल") आणि कंपनीच्या काही ओळखण्यात आलेल्या संबंधित पक्षांदरम्यानच्या महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहारास/व्यवहारांना मंजुरी देणे.

बाब क्र. १५: कंपनीची महत्त्वपूर्ण उपकंपनी वेस्टर्न क्लस्टर लिमिटेड ("डब्ल्यूसीएल") आणि कंपनीच्या काही ओळखण्यात आलेल्या संबंधित पक्षांदरम्यानच्या महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहारास/व्यवहारांना मंजुरी देणे.

बाब क्र. १६: कंपनीची महत्त्वपूर्ण उपकंपनी देसाई सिमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड ("डीसीसीपीएल") आणि कंपनीच्या काही ओळखण्यात आलेल्या संबंधित पक्षांदरम्यानच्या महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहारास/व्यवहारांना मंजुरी देणे.

परिणामी, सध्याच्या पोस्टल बॅलेट प्रक्रियेअंतर्गत बाब क्र. १० ते १६ कंपनीच्या सभासदांच्या मंजुरीसाठी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

सभासदांना पुढे सूचित करण्यात येते की:

ए) बाब क्र. १० ते १६ संदर्भात यापूर्वीच देण्यात आलेली कोणतीही मते पोस्टल बॅलेट सूचनेचे निकाल निश्चित करताना छाननीकर्त्याद्वारे विचारात घेतली जाणार नाहीत;

बी) पोस्टल बॅलेट सूचनेमध्ये समाविष्ट असलेल्या उर्वरित बाबी म्हणजेच बाब क्र. १ ते ९ संदर्भात रिमोट ई-व्होटिंग प्रक्रिया सुरू राहील;

सी) बाब क्र. १० ते १६ मागे घेतल्याने पोस्टल बॅलेट सूचनेमध्ये समाविष्ट असलेल्या उर्वरित बाबींच्या वैधतेवर परिणाम होणार नाही;

डी) या शुद्धिपत्रकाद्वारे सुधारित करण्यात आलेल्या बाबी वगळता, पोस्टल बॅलेट सूचनेमध्ये समाविष्ट असलेला अन्य सर्व मजकूर, अटी आणि प्रकटीकरणे अपरिवर्तित राहतील आणि वैध व अंमलात राहतील; आणि

इ) हे शुद्धिपत्रक पोस्टल बॅलेट सूचनेचा अविभाज्य भाग असेल आणि त्यासोबत वाचले जाईल.

पोस्टल बॅलेट सूचनेचा विचार करताना सभासदांनी वरील सुधारणेची नोंद घ्यावी, अशी विनंती करण्यात येते.

वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेडकरिता

सही/-

टीना लखानी

कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

सभासदत्व क्र.: ए३४७२३

दिनांक: २१ सप्टेंबर, २०२६

ठिकाण: पणजी - गोवा